# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः24.07.2024** **वारःबुधवार**

---

ठळक बातम्या,

१) 2024-25 साठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशातल्या चार कोटींहून अधिक तरुणांना रोजगार आणि कौशल्याच्या संधी उपलब्ध करून देण्याकरता पाच वर्षांसाठी दोन लाख कोटी रुपयांचं पंतप्रधान पॅकेज जाहीर.
२) ग्रामीण विकासासाठी 2 लाख 66 हजार कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद.
३) नवीन करप्रणालीअंतर्गत वेतनधारकांसाठी मानक वजावटीची मर्यादा 75 हजार.
४) परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी कॉर्पोरेट कर आता 35 टक्के.
५) सेंद्रिय शेतीसाठी येत्या दोन वर्षांत एक कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन.
६)आदिवासी विकासासाठी प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियानाची घोषणा.
७) महिला विकासासाठी 3 लाख कोटींहून अधिक रुपयांची तरतूद.
८) शहरांमधल्या एक कोटी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या घरांसाठी पंतप्रधान आवास योजनेत सरकारची 10 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक.
९) केंद्रीय अर्थसंकल्प विकासाभिमुख असल्याचं सांगत उद्योगजगताकडून स्वागत.
१०) नीट युजी परीक्षा रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार.
११) महिला आशिया करंडक क्रिकेटस्पर्धेत भारतीय संघ उपांत्य फेरीत दाखल.

**अंदाज पत्रक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल संसदेत सादर केला. जागतिक स्तरावर आव्हानात्मक परिस्थिती असूनही, भारतीय अर्थव्यवस्था उत्तम कामगिरी करत असल्याचं सांगत येत्या दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असेल असं सीतारामन यावेळी म्हणाल्या. रोजगार, कौशल्य, सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग तसंच मध्यमवर्गावर हा अर्थसंकल्प केंद्रित असून देशातल्या चार कोटींहून अधिक तरुणांना रोजगार आणि कौशल्याच्या संधी उपलब्ध करून देण्याऱ्या पंतप्रधानांच्या पाच योजना अर्थमंत्र्यांनी जाहीर केल्या. यामध्ये पाच वर्षांसाठी दोन लाख कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. विकसित भारतासाठी सविस्तर

पथदर्शी आराखडा सादर करताना या अर्थसंकल्पात सरकारच्या सर्वांना संधी उपलब्ध करून देण्याच्या नऊ प्राधान्यक्रमांचा उल्लेख करण्यात आला आहे. यामध्ये कृषी, रोजगार आणि कौशल्य, सामाजिक न्याय, उत्पादन आणि सेवा, शहरी विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवोपक्रम, संशोधन आणि विकास आदींचा समावेश आहे. अर्थमंत्र्यांनी नवीन करप्रणाली अंतर्गत वेतनधारकांसाठी मानक वजावटीची मर्यादा 50 हजारांवरून 75 हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आल्याचं सांगितलं. तर निवृत्तीवेतनधारकांसाठी कौटुंबिक निवृत्तीवेतनावरील कपात 15 हजार रुपयांवरून 25 हजार रुपयांपर्यंत वाढवली आहे. यामुळं चार कोटी वेतनधारक आणि निवृत्तीवेतनधारकांना दिलासा मिळणार आहे. नवीन कर प्रणालीची निवड करणाऱ्यांसाठी सरकारनं कर दर संरचना देखील सुधारित केली असून त्यानुसार वेतनधारक व्यक्ति साडे सतराहजार रुपयांपर्यंत आयकर वाचवू शकतो. तसंच सरकारनं नवीन पेन्शन स्कीम साठी नियोक्त्यांद्वारे कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या 10 टक्क्यावरून 14 टक्क्यांपर्यंत खर्चाची कपात केली आहे. याशिवाय परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी कॉर्पोरेट करात 40 टक्क्यावरून 35 टक्क्यांपर्यंत कपात केल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. देशातल्या स्टार्ट-अप परिसंस्थेला आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी गुंतवणूकीवरचा एंजल कर रद्द करण्यात आला आहे. प्रलंबित असलेल्या काही प्राप्तीकर विवादांच्या निराकरणासाठी विवाद से विश्वास योजना देखील प्रस्तावित करण्यात आली आहे. भांडवली नफ्यावरील करातही सुसूत्रता आणण्यात आली आहे. कमी मुदतीच्या गुंतवणूकीवरील नफ्यावर 20 टक्के आणि दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीवरील नफ्यावर साडेबारा टक्के कर आकारला जाईल. सरकारनं प्राप्तीकर कर कायदा, 1961 चा सर्वसमावेशक आढावाही जाहीर केला आहे. अर्थसंकल्पात कृषीक्षेत्रासाठी 1 लाख 52 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून येत्या दोन वर्षात देशभरातल्या एक कोटी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहित केलं जाणार आहे. याअंतर्गत त्यांच्या शेतमालाचं प्रमाणीकरण करुन त्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सहाय्य केलं जाईल. रोजगाराच्या पहिल्या 4 वर्षांत उत्पादन क्षेत्रात अतिरिक्त रोजगारासाठी सरकार प्रोत्साहन देणार असून तीस लाख तरुणांना आणि त्यांच्या नियोक्त्याना त्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या योगदानाबाबत हे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पूर्वोदय योजनेअंतर्गत बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि आंध्र प्रदेशसह ईशान्येकडील राज्यांच्या विकासासाठी सरकारतर्फे निधी पुरवला जाणार आहे. गृहनिर्माण क्षेत्रासाठी घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी शहरांमधल्या एक कोटी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या घरांसाठी पंतप्रधान आवास योजनेत सरकार 10 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचं सांगितलं. याशिवाय जे राज्य उच्च मुद्रांक शुल्क आकारत राहतील त्या सर्वांसाठी दर कमी करण्यासाठी केंद्र सरकार प्रोत्साहन देईल आणि महिलांनी खरेदी केलेल्या मालमत्तेसाठी शुल्क कमी करण्याचाही विचार करेल.तसंच महिला विकासासाठीच्या योजनांसाठी तीन लाख कोटींहून अधिक रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. अर्थसंकल्पांत आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रधानमंत्री जनजाती

उन्नत ग्राम अभियानाची घोषणा करण्यात आली. तर देशाच्या ग्रामीण विकासासाठी 2 लाख 66 हजार कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं.

**प्रतिक्रिया**

विकसित भारतासाठीचा यंदाचा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासाची हमी देणारा आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. या अर्थसंकल्पाचा समाजातल्या प्रत्येक घटकाला फायदा होईल आणि विकसित भारताचा मार्ग सुकर होईल असं पंतप्रधान म्हणाले.
तर या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी दोन लाख 62 हजार 200 कोटी रुपयांची केलेली तरतूद ऐतिहासिक असल्याची प्रतिक्रिया रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना कोणताही दिलासा नसल्याचं सांगत काँग्रेस आणि समाजवादी पक्षासह विरोधी पक्षांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हा अर्थसंकल्प भाजपच्या मित्रपक्षांना अनुकूल असल्याची टीका केली आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही हा केंद्रीय अर्थसंकल्प महागाई आणि बेरोजगारीच्या समस्या सोडवण्यात अपयशी ठरल्याची टीका केली. मात्र उद्योगजगतानं या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं असून हा अर्थसंकल्प विकासाभिमुख असल्याची प्रतिक्रिया नोंदवली. फिक्कीचे अध्यक्ष अनिश शाह यांनी प्रतिक्रिया देताना हा अर्थसंकल्प तरुण, महिला आणि शेतकरी यासह अनेक क्षेत्रांवर केंद्रित असल्याचं सांगितलं. तर असोचेमचे सरचिटणीस दीपक सूद यांनीही हा केंद्रीय अर्थसंकल्प संतुलित असल्याचं मत व्यक्त केलं.

**ब्रिटन परराष्ट्र सचिव**

ब्रिटनचे परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी आज भारतभेटीवर येत असून, ते नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेणार आहेत. भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार आणि दोन्ही देशांतील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याबाबत ते चर्चा करतील.वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्याशीही ते चर्चा करतील. लॅमी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेणार आहेत.

**जलजीवन मिशन**

राष्ट्रीय जलजीवन अभियानाअंतर्गत देशात ग्रामीण भागात 15 कोटी घरांमध्ये नळानं पिण्याचं पाणी पोहोचलं असून, या अभियानानं एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे, असं जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात 2024 पर्यंत नळानं पाणीपुरवठा करण्याचं उद्दिष्ट ठेवून 2019 मध्ये हे अभियान सुरू करण्यात आलं होतं. आठ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये शंभर टक्के काम पूर्ण झालं आहे.

**नीट**

नीट-युजी परीक्षा रद्द करायला सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठानं काल हा निर्णय दिला. यंत्रणेतल्या त्रुटीमुळे प्रश्नपत्रिका फुटल्याचा कुठलाही पुरावा नाही असं न्यायालयानं सांगितलं.

**नीट**

नीट परीक्षेबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्वागत केलं असून, शेवटी सत्याचा विजय झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेला त्रुटीमुक्त संस्था बनवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, नीट घोटाळ्यात सहभागी असलेल्यांना सोडलं जाणार नाही, असंही प्रधान यांनी स्पष्ट केलं.

**क्रिकेट-आशिया कप**

महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये, भारतानं श्रीलंकेतील दंबुला इथं झालेल्या अंतिम गट सामन्यात नेपाळवर 82 धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. भारतानं दिलेलं 179 धावांचं उद्दिष्ट गाठताना नेपाळ संघाला 20 षटकांत केवळ 96 धावा करता आल्या. अ गटातून भारत आणि पाकिस्तान उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत, तर नेपाळ आणि यूएई बाहेर पडले आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**